ePaper

## पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला गती; मंत्रिमंडळाची मान्यता



वर्ष - 9 । अंक - 167 UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 12 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

भाजपाचे 'अर्थसंकल्प प्रचार-प्रसार संमेलन' संपन्न..

## दरवर्षीचा अकृषिक (NA) कर कायमचा रद्द! महसूलमंत्री बावनकुळे यांची मोठी घोषणा

# बांधकामासाठी आता 'एनए'ची गरज नाही!

**महाईन्यूज । मुंबई**

**शेतीच्या जमिनीवर घर किंवा अन्य बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून अकृषिक (NA) परवानगी घेण्याची अट रद्द करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. यापुढे बांधकाम आराखडा मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र 'एनए' परवानगी घेण्याची गरज लागणार नाही. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत महत्त्वाची सुधारणा करणारा शासननिर्णय आणि राजपत्र जारी करण्यात आले आहे.**



जमीन महसूल संहितेतील नवीन सुधारणेनुसार शेतजमिनीवर बांधकामासाठी नगर रचना विभाग तसेच स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी किंवा मंजुरी हीच आता 'एनए' परवानगी असणार आहे.

आतापर्यंत नागरिकांना नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम नकाशाला मंजुरी घेतल्यानंतर पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे अकृषक परवानगीसाठी चकरा माराव्या लागत होत्या. नव्या नियमानुसार, जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल, तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच 'अकृषक परवानगी' मानली जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही.

अनेक बँका कर्ज देताना एनए परवानगीचा आग्रह धरतात. मात्र नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी एन परवानगीचा आग्रह धरू नये. जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश शासनाने दिले आहेत.

### भूखंडाचे क्षेत्रफळ एकरकमी अधिमूल्य दर

१००० चौ.मी. पर्यंत – चालू बाजार मूल्याच्या ०.१० टक्के
१००१ ते ४००० चौ.मी. – चालू बाजार मूल्याच्या ०.२५ टक्के
४००० चौ.मी. पेक्षा जास्त – चालू बाजार मूल्याच्या ०.५० टक्के

### 'एनए' कराच्या थकबाकीतूनही सूट

बिनशेती झालेल्या मिळकतींवर दरवर्षी आकारला जाणारा अकृषिक कर आकारण्यात येवू नये. सदर सुधारणेच्या दिनांकापर्यंत दरवर्षी आकारला जाणारा थकीत अकृषिक कराच्या वसुलीतून सूट देण्यात आली आहे. ज्या मिळकती दिनांक ३१ डिसेंबर २००१ रोजी किंवा त्यापूर्वी बिनशेती झाल्या, त्या मिळकतींवर दरवर्षी आकारल्या जाणाऱ्या अकृषिक कराऐवजी, २००१ च्या चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ मध्ये नमूद टप्प्यांनुसार व दराने अधिमूल्याची रक्कम शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून एक वर्षाच्या आत भरणे संबंधित मिळकतधारक यांना अनिवार्य राहणार आहे. त्यानंतर सदर रक्कम दंड आणि व्याजासह वसूल करण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

### ७/१२ मध्ये नोंद होणार

संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून जमिनीवर विकास/ बांधकाम परवानगी दिल्यानंतर इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली (MBPS) किंवा विकास नियंत्रण नियमावलीत (AUTO DCR) तसेच डिजिटल ७/१२ मध्ये अकृषिक नोंद करण्यात येणार आहे.ज्याठिकाणी ऑनलाइन संगणकीय प्रणाली नसेल त्या ठिकाणी तेथील तहसीलदारांनी ही नोंद करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. केवळ बांधकाम परवानगी मिळाली म्हणून 'भोगवटादार वर्ग-२' (कमी श्रमाच्या जमिनी) च्या दर्जा मध्ये बदल होणार नाही; त्यांच्यासाठी आवश्यक असलेले नजराणा शुल्क भरावेच लागेल.



> नवीन सुधारणेमुळे सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मी हा निर्णय घेतला. यासाठी आवश्यक त्या सर्व सुधारणा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत करण्यात आल्या. हिवाळी अधिवेशातच याबाबतची रूपरेषा ठरली होती. फडणवीस सरकार जनतेच्या कल्याणासाठी काम करते, याचे प्रत्यंतर देणारा हा निर्णय आहे. आता वार्षिक अकृषक कर देखील रद्द करण्यात आला आहे.
>
> – चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

# भाजपचा आपल्याच ६९ नेत्यांना दणका

## महापालिका बंडखोरांवर भाजपची कठोर कारवाई

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या विरोधात निवडणूक लढविणाऱ्या तसेच भाजप उमेदवारांच्या विरोधात बंडाचे निशाण फडकविणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे. पक्षाच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या ६९ जणांवर थेट निलंबनाची कारवाई करण्यात आली असून त्यांचे सहा वर्षे निलंबन करण्यात आले आहे.**






महापालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांची संख्या जास्त होती. पक्षाकडून उमेदवारी मिळावी, यासाठी अनेक जण इच्छुक होते. सुमारे अडीच हजार इच्छुकांनी पक्षाचे अर्ज भरले होते. इतर पक्षांकडून भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या आणि मर्यादित जागा यामुळे अनेकांना तिकिट मिळाले नाही. त्यामुळे नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी बंडखोरी करत निवडणूक लढविली तर काहींनी भाजप उमेदवाराच्या विरोधात असलेल्या उमेदवाराचा प्रचार केला.

या संपूर्ण प्रकाराची गंभीर दखल भाजपने घेतली आहे. महापालिका निवडणुकीत भाजपच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या ६९ जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या कार्यकर्त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आली असून पुढील सहा वर्ष त्यांना निवडणूक लढविण्यासाठी मज्जाव करण्यात आला आहे. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी या ६९ जणांची यादी जाहीर केली आहे.

निलंबनाची कारवाई करण्यात आलेल्यांमध्ये हडपसर विधानसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांचा सर्वाधिक समावेश आहे. या मतदारसंघातून १९ जणांना निलंबित करण्यात आले आहे. त्यापाठोपाठ खडकवासला विधानसभा मतदारसंघातून ९ जणांना, वडगाव शेरी मतदार संघातून ८, शिवाजीनगर मतदारसंघातून ७ जणांचा समावेश आहे.

कोथरूड विधानसभा आणि कसबा विधानसभा मतदारसंघातून प्रत्येकी सहा तर पर्वती मधून ४ जणांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान, भाजपने ज्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. त्यापैकी अनेक जणांनी यापूर्वीच पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. पक्षाकडून हकालपट्टी होण्याआधीच अनेकांनी भाजपला रामराम केला आहे.

# पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला गती; मंत्रिमंडळाची मान्यता

**महाईन्यूज । पुणे**

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास राज्याच्या मंत्रिमंडळाने मंगळवारी मान्यता दिली आहे. त्यासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची (एसपीव्ही) स्थापना करण्यात आली आहे. तसेच, विमानतळाच्या भूसंपादनाविरोधात शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया ही सुरू करण्याची मान्यता मंत्रिमंडळाने दिली आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे भूसंपादनाची प्रक्रिया वेगाने होणार आहे.**



> “ राज्य सरकारकडून भूसंपादनाचा निधी उपलब्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांना तो वितरित केला जाईल. एमआयडीसीकडून अधिसूचना जारी करून दरनिश्चिती अंतिम केली जाणार आहे. या निर्णयामुळे भूसंपादनाला गती मिळणार आहे.
>
> – जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी

### गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया नियमानुसार सुरू

पुरंदर विमानतळ भूसंपादनासाठी अधिसूचना जारी झाल्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर विरोध दर्शवित आंदोलन केले होते. आंदोलन चिघळल्यामुळे गेल्या वर्षी पोलिसांकडून आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मध्यस्थीनंतर शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार हे गुन्हे मागे घेण्यास राज्य सरकारने मान्यता दिली. आता ही गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया नियमानुसार सुरू करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विशेष हेतू प्राधिकरणाची (स्पेशल पर्पज व्हेईकल – एसपीव्ही) स्थापना करण्यात आली आहे. या प्राधिकरणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी), शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) तसेच अन्य संस्थांची एसपीव्ही स्थापन करण्यात आली आहे.

विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये ३ हजार एकर जमिनीची आवश्यकता भासणार आहे. या भूसंपादनासाठी ९६ टक्के शेतकऱ्यांची संमतिपत्रे दिली आहेत. भूसंपादन करण्यासाठी सुमारे सहा हजार कोटींच्या निधीची आवश्यकता आहे. हा निधी कर्ज स्वरूपात उभारण्याचे यापूर्वी निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार ‘हुडको’ या संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या कर्जास हमी देण्यासही राज्य शासनाने मान्यता दिली असून, कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी एसपीव्हीमधील सहभागीदारी, त्यांच्याकडील भागीदारीनुसार राहणार आहे.



राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ३२(१) कलमानुसार जमीन मोबदल्याची दरनिश्चिती करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. आता एमआयडीसी या संदर्भात परिपत्रक जारी करून दर निश्चित करणार आहे.

त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मोबदल्याची रक्कम दिली जाणार आहे.

# भाजपाचे 'अर्थसंकल्प प्रचार-प्रसार संमेलन' उत्साहात संपन्न

## युवा उद्योजक घडवण्याचे आवाहन; स्टार्टअप, कौशल्य विकास व करसवलतींची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदी सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'अर्थसंकल्प प्रचार-प्रसार संमेलन' उत्साहात आयोजित करण्यात आले. या संमेलनात अर्थसंकल्पातील विविध योजना तसेच त्याचा युवकांना होणारा फायदा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून भाजपा महाराष्ट्र प्रदेश कामगार आघाडीचे सरचिटणीस हनुमंत लांडगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बाप्पू) काटे यांनी भूषविले.**




> "पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक शहरातील प्रत्येक युवकाने या अर्थसंकल्पातील संधी ओळखून पुढे यावे. केंद्र सरकारच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. युवा मोर्चा कार्यकर्ते घराघरात जाऊन माहिती देऊन युवकांना स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहतील."
>
> – शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

हनुमंत लांडगे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून विकसित भारताचा पाया रचणारा आहे. विशेषतः कामगार आणि मध्यमवर्गीयांच्या हिताचे रक्षण यामध्ये करण्यात आले आहे. नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित रोजगाराच्या संधींमुळे तरुणांचे भविष्य अधिक उज्ज्वल होणार आहे."

अध्यक्षीय भाषणात शत्रुघ्न काटे म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक नगरीतील युवकांनी विविध योजनांचा लाभ घेत उद्योजकतेकडे वळावे." युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी या योजना घराघरात पोहोचवून सर्वसामान्यांना सक्षम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

संमेलनात स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास, कररचनेतील सवलती आणि युवकांसाठीच्या विविध योजनांवर विशेष सादरीकरण करण्यात आले. अर्थसंकल्पातील सकारात्मक बाबी सोप्या भाषेत स्पष्ट करणारी माहितीपत्रकेही यावेळी वितरित करण्यात आली. शहरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने युवक व नागरिकांनी सहभाग नोंदविला.

या संमेलनामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात शहरातील विविध ठिकाणी अशाच प्रकारची माहिती सत्रे आयोजित करण्याचा मानस युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा पिंपरी-चिंचवड शहर सरचिटणीस मधुकर बच्चे, युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे, पूर्व शहराध्यक्ष संकेत चोंधे, युवा मोर्चा सरचिटणीस सुमित घाटे, प्रसाद कस्पटे, दिनेश काटे तसेच युवा मोर्चाचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासकामांसाठी पशुसंवर्धन जागा हस्तांतरणाचा पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी–चिंचवड शहराच्या दीर्घकालीन आणि नियोजनबद्ध विकासासाठी आमदार शंकर जगताप यांनी पुन्हा एकदा सक्रिय पुढाकार घेतला आहे. ताथवडे परिसरातील पशुसंवर्धन विभागाची जागा पिंपरी–चिंचवड महापालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या मागणीसंदर्भात आमदार जगताप यांनी मंत्रालयात महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.**



> "पिंपरी–चिंचवड शहर झपाट्याने वाढत आहे आणि या वाढीला समर्थ पायाभूत सुविधा देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ताथवडे येथील जागा महापालिकेकडे हस्तांतरित झाल्यास ४५ मीटर स्पाईन रोड, पूल, रुग्णालय व इतर अत्यावश्यक सुविधा उभारण्यास मोठी गती मिळेल. पशुसंवर्धन विभागाच्या कार्यात कोणतीही अडचण येऊ न देता पर्यायी जागेची व्यवस्था करून हा प्रश्न सकारात्मकरीत्या मार्गी लावण्यासाठी मी कटिबद्ध आहे."
>
> – शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

या भेटीदरम्यान आमदार जगताप यांनी पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात समाविष्ट असलेल्या ताथवडे येथील जागेचे महत्त्व अधोरेखित केले. या जागेच्या माध्यमातून ४५ मीटर स्पाईन रोड, पवना नदीवरील प्रस्तावित पूल, एसटीपी (STP), अग्निशमन केंद्र, ईएसआर (ESR) आणि रुग्णालय यांसारख्या अत्यावश्यक नागरी सुविधांची उभारणी नियोजित असल्याची माहिती त्यांनी दिली. शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा ताण लक्षात घेता हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या संदर्भात यापूर्वी मंत्रालय स्तरावर झालेल्या बैठका, अधिकाऱ्यांच्या संयुक्त पाहण्या, पशुसंवर्धन विभागाकडून मिळालेली प्राथमिक सहमती तसेच विकास आराखड्यातील तरतुदी यांचा तपशीलवार आढावा आमदार जगताप यांनी मंत्री महोदयींसमोर मांडला. शहराचा विकास करताना पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, तसेच विभागासाठी पर्यायी आणि योग्य जागा उपलब्ध करून देण्याची तयारी असल्याची भूमिका आमदार जगताप यांनी स्पष्ट केली. त्यांच्या या सकारात्मक आणि समन्वयात्मक भूमिकेची दखल घेत मा. पंकजाताई मुंडे यांनीही विषयावर अनुकूल प्रतिसाद दिला.

पिंपरी–चिंचवडसारख्या वेगाने विकसित होत असलेल्या शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन संबंधित सर्व विभागांशी समन्वय साधत कायदेशीर व प्रशासकीय चौकटीत योग्य निर्णय घेण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आली. तसेच आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करून पुढील कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देशही दिले आहे. पिंपरी–चिंचवड शहराच्या सर्वांगीण, शाश्वत आणि नियोजनबद्ध विकासासाठी आमदार शंकर जगताप सातत्याने पाठपुरावा करत असून, नागरिकांच्या हिताचे प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्याचा त्यांचा प्रयत्न पुढेही कायम राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# राज्याच्या अर्थसंकल्पातील युवक व रोजगार धोरण



## भूमिका

**राज्याचा अर्थसंकल्प हा केवळ उत्पन्न-खर्चाचा लेखाजोखा नसून तो विकासाचा व्यापक आराखडा असतो. विशेषतः युवक आणि रोजगार या दोन घटकांभोवती आखलेले धोरण राज्याच्या भविष्यातील सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य ठरवते. वाढती युवकसंख्या, बदलते तंत्रज्ञान, स्वयंचलितीकरण आणि जागतिक स्पर्धा यामुळे रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे.**

या पार्श्वभूमीवर यंदाच्या अर्थसंकल्पातील युवक व रोजगारविषयक तरतुदींचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

अर्थसंकल्पात कौशल्य विकास, स्टार्टअप प्रोत्साहन, स्वयंरोजगार आणि उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. पारंपरिक सरकारी नोकऱ्यांवरचा ताण कमी करून खाजगी क्षेत्र आणि उद्योजकतेला चालना देण्याचा प्रयत्न दिसतो. तरुणांना बीजभांडवल, सवलतीची कर्जयोजना, करसवलती, इन्क्युबेशन केंद्रे आणि मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा सकारात्मक आहे. डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, हरित ऊर्जा, ई-वाहन उद्योग, कृषी-प्रक्रिया आणि सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण करण्याचा दृष्टिकोन मांडण्यात आला आहे.

मात्र, केवळ योजनांची घोषणा पुरेशी नसते; अंमलबजावणीची परिणामकारकता ही खरी कसोटी असते. कौशल्य विकास कार्यक्रमांमध्ये लाखो युवकांना प्रशिक्षण दिल्याचे सांगितले जाते, परंतु प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष रोजगार मिळण्याचे प्रमाण किती आहे, याचा पारदर्शक आढावा आवश्यक आहे. उद्योगांच्या गरजा आणि प्रशिक्षण अभ्यासक्रम यामध्ये अनेकदा तफावत आढळते. ही दरी कमी करण्यासाठी उद्योग-शैक्षणिक संस्था यांच्यात सुसंवाद वाढवणे, अप्रेंटिसशिप आणि ऑन-द-जॉब ट्रेनिंगला प्रोत्साहन देणे आवश्यक ठरेल.

ग्रामीण आणि शहरी भागातील रोजगाराच्या संधींमध्ये मोठी दरी आहे. शहरांमध्ये उद्योग आणि सेवा क्षेत्राची वाढ होत असताना ग्रामीण भागातील युवकांना मर्यादित पर्याय उपलब्ध असतात. त्यामुळे स्थलांतर वाढते आणि सामाजिक ताण निर्माण होतो. शेतीपूरक उद्योग, अन्नप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, पर्यटन, बांबू व वनउद्योग, हस्तकला यांसारख्या क्षेत्रांना अर्थसंकल्पातून अधिक बळ दिल्यास स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती शक्य होईल. लघु व मध्यम उद्योगांना दिलेल्या सवलतींचा प्रत्यक्ष लाभ तळागाळातील उद्योजकांपर्यंत पोहोचणेही महत्त्वाचे आहे.



महिलांसाठी, दिव्यांगांसाठी आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी विशेष तरतुदी केल्यास रोजगार धोरण अधिक सर्वसमावेशक ठरेल. स्वयं-सहायता गट, डिजिटल साक्षरता अभियान आणि सूक्ष्म वित्तपुरवठा योजनांमुळे महिलांची आर्थिक भागीदारी वाढू शकते. तसेच, नव्या अर्थव्यवस्थेत 'गिग इकॉनॉमी' आणि फ्रीलान्सिंग यांसारख्या संधी वाढत असताना त्यासाठी आवश्यक कायदेशीर आणि सामाजिक सुरक्षा यंत्रणा उभी करणेही गरजेचे आहे.

आजचा युवक केवळ नोकरीच्या सुरक्षिततेकडे पाहत नाही, तर नवकल्पना, स्वातंत्र्य आणि जागतिक स्पर्धेत आपली छाप पाडण्याची संधी शोधतो. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, संशोधनाला प्रोत्साहन आणि स्टार्टअप संस्कृतीचा प्रसार करणे आवश्यक आहे. रोजगार हमीपेक्षा रोजगारक्षमतेवर भर देणे ही काळाची गरज आहे.

एकूणच, राज्याच्या अर्थसंकल्पातील युवक व रोजगार धोरणाने सकारात्मक दिशा दाखवली आहे. परंतु घोषणांपासून प्रत्यक्ष परिणामांपर्यंतचा प्रवास पारदर्शक, मोजता येण्याजोगा आणि सातत्यपूर्ण असणे अत्यावश्यक आहे. युवकशक्ती ही राज्याची सर्वात मोठी भांडवल आहे; तिचे योग्य नियोजन आणि सक्षम अंमलबजावणी झाली, तरच विकासाचे स्वप्न वास्तवात उतरेल.

## प्रासंगिक »

### चतुर कोंबडी आणि लबाड कोल्हा

***एका लोककथेनुसार राम नावाच्या माणसाकडे एक देखणा आणि ताकदवान घोडा होता. राम त्या घोड्याची खूप जपणूक करत असे. त्यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. एके दिवशी शाम नावाच्या घोडेव्यापाऱ्याने तो घोडा पाहिला आणि तो मिळवण्याचा कपटी डाव रचला.***


त्याने रामच्या रोजच्या रस्त्यावर भिकाऱ्याचे सोंग घेतले आणि स्वतःला आजारी असल्याचे भासवले. राम घोड्यावरून जात असताना शाम मोठ्याने विव्हळू लागला व मदतीची याचना करू लागला. दयाळू रामला त्याची कीव आली. त्याने शामला घोड्यावर बसवले आणि स्वतः पायी चालू लागला. काही अंतरावर पोहोचताच शाम घोडा घेऊन पळून गेला आणि पुढील गावात तो विकून टाकला. दुसऱ्या दिवशी तो रामकडे येऊन म्हणाला की सरळ मागितला असता तर घोडा मिळाला नसता, म्हणून त्याने फसवणूक केली. राम शांतपणे म्हणाला, "ही गोष्ट कुणाला सांगू नकोस; नाहीतर लोक गरजूंना मदत करणे बंद करतील. विश्वासघात करणे हे महापाप आहे."

**तात्पर्य**-गरजूला मदत करण्यापूर्वी तो खरेच गरजवंत आहे याची खात्री करणे सूज्ञपणाचे ठरते.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातात निधनानंतर रक्षा विसर्जन होताच सत्तेचा निर्णय घेण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यावर आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

# राज्यहितासाठी सत्ताधाऱ्यांनी लक्ष केंद्रीत करावे..!

महापालिका आणि नगरपालिकांप्रमाणे १२ जिल्हा परिषदांमध्येही मतदारांनी भाजपसह महायुतीला मोठा कौल दिला आहे, ते अपेक्षितच होते. केंद्र आणि राज्यात सरकार असलेल्या पक्षाच्या बाजूने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदान करण्याची मतदारांची मानसिकता असते, कारण मुख्यत्वे त्यामागे विकासाची आस असते. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या तीन दमदार नेत्यांच्या रिक्षात बसलो तर विकासाच्या मार्गाने गतीने जाऊ, असा विश्वास मतदारांना वाटत असल्याचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे गेल्या दोन महिन्यांमधील निकाल सांगत आहेत.



अजित पवार आज नसले तरी त्यांच्या पक्षाला चांगले यश मिळाले आहे. देवेंद्र फडणवीस हे राज्यातील क्रमांक एकचे नेते असल्याचे पुन्हा एकदा या निकालाने निर्विवादपणे अधोरेखित केले आहे. एकनाथ शिंदे यांना मानले पाहिजे. उजव्या हाताला भाजप आणि डाव्या हाताला राष्ट्रवादी, समोर उद्धवसेना, अशी आव्हाने असतानाही त्यांनी केवळ आपला पक्ष टिकवूनच ठेवला नाही, तर ते दमदार यशदेखील मिळवत आहेत. विधानसभेतील यश हा अपघात नव्हता हे त्यांनी सिद्ध केले. जिल्हा परिषदांमधले यश हे जसे या तिन्ही नेत्यांचे, तसेच ते वेगवेगळ्या भागांत असलेल्या त्यांच्या विश्वासू आणि वजनदार सहकाऱ्यांचेदेखील आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनाने तयार झालेल्या सहानुभूतीचा फायदा त्यांच्या पक्षाला नक्कीच झाला असला तरी एकहाती सत्ता केवळ पुणे जिल्हा परिषदेत मिळाली. एकेकाळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या पश्चिम / दक्षिण महाराष्ट्रात भाजपने मारलेली जोरदार मुसंडी भाजपचे मित्रपक्ष आणि विरोधक या दोघांनाही आत्मचिंतन करायला लावणारी आहे. मराठवाड्यातही भाजपने चांगले यश मिळविले आणि शहरांबरोबर ग्रामीण भागातही पकड सिद्ध केली. भाजपच्या यशात लातूरसारखे काही कच्चे दुवेदेखील आहेत. सत्तारूढ आणि विरोधी पक्षांचीही जागा महायुतीनेच व्यापली असल्याचे विविध निकालांवरून दिसते. साताऱ्यात ६५ पैकी ६२ जागा महायुतीतील तीन पक्षांनी जिंकल्या. उद्या तेथे सत्तेचे कोणतेही समीकरण बसले तरी सत्तापक्ष आणि विरोधी पक्ष एकाच बाजूचा असेल. महाविकास आघाडीसाठी ही चिंतेची बाब आहे. मुळात ही आघाडी पुढच्या काळात टिकणार की नाही, हा प्रश्नच आहे. काँग्रेसला स्वबळाचे वेध लागले आहेत. पक्षाची स्थिती इतकी वाईट असूनही आपल्याला कोणाचीच गरज नाही हा अहंभाव कायम आहे. बरे! जे मिळाले ते टिकवण्याऐवजी गमावण्याकडे पक्षाचा कल दिसतो. चंद्रपूर त्याचे उत्तम उदाहरण आहे.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणी जडों देसी ॥२॥तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आम्ही एनडीएमध्ये आहोत आणि राहणार

## सुनील तटकरेंची राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत रोखठोक भूमिका

महाईन्यूज । मुंबई

**अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सांभाळली आहे. काल पदभार स्वीकारल्यानंतर आज सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी या भेटीबद्दल, तसेच दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलीनीकरणाबाबत महत्त्वाचे भाष्य केले आहे.**



अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सांभाळली आहे. काल पदभार स्वीकारल्यानंतर आज सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी या भेटीबद्दल, तसेच दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलीनीकरणाबाबत महत्त्वाचे भाष्य केले आहे.

आज राजकीय चर्चेचा विषय नव्हताच, आज फक्त दादांच्या दुर्दैवी अकाली निधनानंतर जी जबाबदारी धिरोदत्तपणे वहिनींनी सांभाळली आहे, त्याबद्दलच्याच संवेदना व्यक्त करण्यात आल्या असे सुनील तटकरे म्हणाले. विलीनीकरणाबाबत तुमच्या पक्षाची भूमिका का असणार आहे? असा प्रश्न तटकरे यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना तटकरे यांनी "आमच्या पक्षाच्या भूमिकेचा प्रश्न येतोच कुठे?" असे उत्तर दिले. पुढे बोलताना तटकरे म्हणाले की, आम्ही एनडीएमध्ये आहोत.

दादा असतानाच मी वारंवार भूमिका स्पष्ट केली की, आम्ही दादांच्या नेतृत्वाखाली सामूहिकरित्या एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला. तो कालही होता, आजही आहे आणि उद्या भविष्यामध्येही राहिल. त्यामुळे एनडीएमध्ये येण्याबाबतची स्पष्टता कोणीतरी करणे आवश्यक आहे, असे तटकरे म्हणाले. आता विलीनीकरण किंवा काय...उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी वहिनींनी स्वीकारली आहे. आम्ही आमच्या पक्षाचा निर्णय सामुदायिकरित्या सर्व विधिमंडळ सदस्यांनी एकमताने घेतला. पक्षाचे वरिष्ठ नेत्यांनी म्हणजे प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष म्हणून मी असेन, भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे आणि आमचे सर्व मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सहकारी असतील सर्वांनीच भूमिका घेतली की वहिनीच विधिमंडळ पक्षाच्या नेत्या असल्या पाहिजेत. त्यापद्धतीने आम्ही निवड केली, असेही सुनील तटकरे म्हणाले.

आपल्याला ज्ञात आहे की, २०२३ मध्ये ज्या वेळेला वारंवार पक्षामध्ये चर्चा होऊन देखील भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्याचा निर्णय होत नाही, त्यावेळेला आम्ही स्वर्गीय चव्हाण साहेबांचा विचार आहे की बहुजन समाजाचे हित साधायचे असेल तर सत्तेमध्ये असलं पाहिजे. पण आमची मूळ विचारधारा, धर्म निरपेक्ष विचारधारा, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची सामाजिक समता या विचारासह आमचा एनडीएमध्ये सहभाग झाला. तो निर्विवादपणे पुढच्या कालावधीमध्ये राहणार आहे, असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

### भाजपाबरोबर सत्तेत असावं ही दादांची भूमिका

एनडीएबरोबर येण्याची जर त्यांची (शरद पवारांचा गट) भूमिका असेल तर तुम्ही स्वागत करणार का? असा प्रश्न विचारला असता तटकरे यांनी उत्तर देणे टाळले. जर तर वर मी कसं बोलणार? कारण आपल्याला ज्ञात आहे की, २०१९ पासून किंवा २०१४ पासून भारतीय जनता पक्षाबरोबर सरकारमध्ये असावं अशी स्वर्गीय दादांची भूमिका होती. राष्ट्रावादी काँग्रेस पक्षाच्या त्यावेळच्या सर्व बैठकीमध्ये दादा ती भूमिका स्पष्टपणे मांडतही आले. २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा एकत्रितपणे शपथविधी सुद्धा झाला. तेव्हा देखील दादांनी स्पष्ट भूमिका मांडली होती की तीन पक्षांच्या सरकारपेक्षा दोन पक्षांचं सरकार विशेषतः भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं सरकार महाराष्ट्राला प्रगती पथावर नेईल अशी दादांची भूमिका त्या कालावधीमध्ये होते.

# अहिल्यानगर महापालिकेची आर्थिक परिस्थिती चिंताजनक

महाईन्यूज । अहिल्यानगर

**महापालिकेच्या जमा व खर्चात दरमहा ४.६८ कोटींची तफावत निर्माण झाली आहे.वीज देयकासह सेवासुविधा पुरवणारे ठेकेदार, पुरवठादार, कर्मचाऱ्यांची २३० कोटींची देणी थकीत आहेत, याकडे लक्ष वेधत महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी महापालिकेची आर्थिक स्थिती चिंताजनक असल्याचे जाहीर केले आहे.**



महापालिकेमध्ये गेली दोन वर्षे 'प्रशासक राज' होते. गेल्या आठवड्यातच महापालिकेचे सभागृह अस्तित्वात येऊन महापौरपदी ज्योती अमोल गाडे व उपमहापौरपदी धनंजय जाधव यांची निवड झाली. लोकप्रतिनिधींचा कारभार सुरू होताच आयुक्तांनी महापालिकेची आर्थिक परिस्थिती चिंताजनक असल्याचे जाहीर केले आहे. अधिक माहिती देताना आयुक्त डांगे यांनी सांगितले की, मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी २४० कोटींपेक्षा अधिक आहे. गाळेधारकांची थकबाकीही ३० कोटींपेक्षा अधिक आहे. मनपा कर्मचाऱ्यांचे वेतन, वीज देयके व इतर अत्यावश्यक सेवांचा दरमहा खर्च २४.४० कोटी आहे. त्या तुलनेत दरमहा सरासरी १९ कोटी रुपये जमा होतात. त्यामुळे जमा आणि खर्चात प्रत्येक महिन्याला ४.६८ कोटींची तफावत निर्माण झाली आहे. परिणामी, महापालिकेसमोर एकूण २३० कोटी १५ लाख रुपयांच्या देणींचा डोंगर उभा आहे. त्यामुळे सेवा व सुविधांवर परिणाम होण्याचीही शक्यता आहे. नागरिकांनी त्यांच्याकडे थकीत असलेल्या कराचा भरणा करावा व मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे. जीएसटी अनुदान (११.७२ कोटी) आणि महसुली उत्पन्न (८ कोटी) असे मिळून दरमहा सरासरी १९ कोटी ७२ लाख रुपये महापालिकेत जमा होतात. मात्र, कर्मचारी वेतन, निवृत्तीवेतन, पाणी योजना व पथदिव्यांची वीज देयके आणि इतर अत्यावश्यक सेवांचा मासिक खर्च सुमारे २४ कोटी ४० लाख रुपयांवर गेला आहे. यामुळे दर महिन्याला महापालिकेला ४ कोटी ६८ लाख रुपयांचा तुटवडा भासत असून देणीही वाढत आहेत. सद्यस्थितीत महापालिकेला २३० कोटींची देणी आहेत. यात कर्मचारी ७ वा वेतन आयोग फरक १०७ कोटी, विकास कामांची देयके ८० कोटी, कुत्र्यांचा बंदोबस्त करणे ५० लाख, विविध योजनांचा मनपा हिस्सा ५० कोटी, पाणी पुरवठा वीज देयके १६.८५ कोटी, इतर देयके ९ कोटी, न्यायालयीन प्रलंबित देयके ९ कोटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी रक्कम ७ कोटी, पुरवठादार देयके ४ कोटी, अशुद्ध पाणी आकार ४ कोटी, वेतन कपात रक्कम ३.५० कोटी. ६ वा वेतन आयोग फरक ३ कोटी, ५ वा वेतन आयोग फरक २ कोटी, सेवा उपदान रक्कम २ कोटी, परिभाषित निवृत्तीवेतन हिस्सा १.७५ कोटी, अर्जित रजा वेतन रक्कम ७५ लाख, कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके ५० लाख, पथदिवे वीज देयके ४८ लाख आदींचा समावेश आहे. महापालिकेच्या उत्पन्नाचे प्रमाण कमी आणि अत्यावश्यक सेवांचा खर्च जास्त असल्याने आर्थिक नियोजन करताना मोठी कसरत करावी लागत आहे. वाढत्या कराच्या थकबाकीमुळे दंडाची रक्कमही वाढत आहे. परिणामी महापालिकेसह नागरिकांवरही दंडाचा बोजा पडत आहे. येत्या काळात परिस्थितीत सुधारणा न झाल्यास नागरी सेवा, सुविधांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. मालमत्ता कर आणि इतर करांची थकबाकी मोठ्या प्रमाणात आहे. ही थकबाकी वसूल झाल्याशिवाय विकासकामांना गती देणेही कठीण आहे. त्यामुळे नागरिकांनी आपला थकीत कर त्वरित जमा करून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### आगामी अंदाजपत्रकाचे आव्हान

विशेष म्हणजे पुढील महिन्यात महापालिकेचे अंदाजपत्रक सादर होणार आहे. त्याचे आव्हान नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांसमोर असणार आहे तसेच गेल्या दोन वर्षांपासून तरतूद न केलेल्या महापौर- उपमहापौर-सभापती व नगरसेवकांच्या निधीसाठी तरतूद करावी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांकडून महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीबद्दलची आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे.

# राहुल गांधींच्या दाव्याने लोकसभेत खळबळ

## एपस्टीन फाइल्स, अदानी, अंबानी आणि PM मोदी

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**लोकसभेत आज पुन्हा एकदा वातावरण तापलेलं पाहायला मिळालं. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार विरोध केला आणि सभागृहात गोंधळ उडाला. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात "एपस्टीन फाइल्स"चा उल्लेख करत सरकारवर गंभीर आरोप केले. "अजूनही लाखो कागदपत्रं बंदिस्त आहेत. पंतप्रधानांच्या डोळ्यांत भीती स्पष्ट दिसत आहे. यामागे कारणं आहेत, एक एपस्टीन प्रकरण आणि दुसरं अदानी," असं ते म्हणाले.**





विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, "अनिल अंबानी नावाचा एक उद्योगपती आहे. मला विचारायचे आहे की तो तुरुंगात का नाही? कारण त्याचे नाव एपस्टाईन फाइल्समध्ये आहे. मला हरदीप पुरी यांना हे देखील विचारायचे आहे की त्यांची एपस्टीनशी ओळख कोणी करून दिली. मला माहित आहे की त्यांची ओळख कोणी करून दिली आणि हरदीप पुरी यांनाही माहिती आहे." राहुल गांधींनी हे बोलताच सभागृहात गोंधळ उडाला.

त्यांनी थेट नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधत टीका केली की, सरकार दबावाखाली असल्याचं दिसतं आहे. राहुल गांधी यांच्या मते, गौतम अदानी हे सामान्य उद्योगपती नसून त्यांच्या कंपन्यांवर अमेरिकेत खटले सुरू आहेत. "या सगळ्याचा परिणाम थेट पंतप्रधानांवर होत आहे," असा दावा त्यांनी केला. यावर भाजप नेते रविशंकर प्रसाद आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. राहुल गांधी तथ्यहीन आरोप करत असल्याचं त्यांनी म्हटलं. राहुल गांधी म्हणाले, "कोणताही भारतीय पंतप्रधान दबावाशिवाय असे करार करत नाही. आज जे काही घडलं आहे, ते फक्त पंतप्रधानांचं नाही तर देशातील 140 कोटी लोकांचं सरेंडर आहे." यामागे सत्ताधारी पक्षाचं आर्थिक जाळं कारणीभूत असल्याचाही आरोप त्यांनी केला. दरम्यान, या वक्तव्यांनंतर सभागृहात प्रचंड गदारोळ झाला आणि अध्यक्षांनी वारंवार सदस्यांना शांत राहण्याचं आवाहन केलं.


### देश विकायला लाज वाटत नाही का?

राहुल गांधी यांनी पुढे सरकारवर परराष्ट्र धोरण आणि व्यापार करारांवरूनही टीका केली. "अमेरिका आपल्या निर्णयांवर प्रभाव टाकत आहे. शेती क्षेत्र परदेशी कंपन्यांसाठी खुलं करण्यात आलं, शेतकऱ्यांचा विचारच केला नाही. देश विकताना यांना लाज वाटत नाही का?" असा सवाल त्यांनी केला. त्यांनी अमेरिकेच्या टॅरिफमध्ये झालेल्या वाढीचा उल्लेख करत सांगितलं की, भारत सरकारने दबावाखाली निर्णय घेतले आहेत.

# पाकव्याप्त काश्मीर भारतामध्ये दाखवलेला नकाशा हटवला

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारत आणि अमेरिका यांनी अंतरिम व्यापार करारासाठी ७ फेब्रुवारी रोजी एक आराखडा जाहीर केल्यानंतर अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने ऑनलाईन प्रसिद्ध केलेल्या एका नकाशाने जगाचे लक्ष वेधून घेतले होते. या नकाशात संपूर्ण जम्मू-काश्मीर प्रदेश त्यात पाकव्याप्त काश्मीर याचाही समावेश भारताचा भाग म्हणून दाखवण्यात आला होता, चीनकडून दावा करण्यात येणारा अक्साई चीन हाही भारताचा भाग दर्शवण्यात आला होता.**




मात्र, आता अमेरिकेने पुन्हा एकदा यू-टर्न घेतला असून भारताचा तो नकाशा हटवला आहे. भारत आणि अमेरिकेमध्ये अलिकडेच झालेल्या अंतरिम व्यापार करारानंतर अमेरिकेने अखंड भारताचा नकाशा शेअर करून सर्वांना धक्का दिला होता. या नकाशात अमेरिकेने वादग्रस्त भागांऐवजी पीओके आणि अक्साई चीन हे भारताचे अविभाज्य भाग म्हणून दाखवले होते. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याची भूमिका भारताने नेहमीच मांडली असली, तरी हा नकाशा अमेरिकेच्या आधीच्या नकाशांपेक्षा वेगळा होता. यापूर्वी अमेरिकेच्या नकाशांमध्ये हा वादग्रस्त प्रदेश म्हणून दाखवला जात असे.

या पावलाची वेळही महत्त्वाची मानली जात होती. कारण, तणावपूर्ण काळानंतर भारत आणि अमेरिका द्विपक्षीय संबंध नव्याने मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत. याआधी ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयात शुल्क लावले होते, जे अमेरिकेच्या मित्रदेशांमध्ये सर्वाधिक होते. मात्र, या अंतरिम व्यापार आराखड्याअंतर्गत हे शुल्क आता १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले असून, कोणत्याही आशियाई देशासाठी हे सर्वात कमी आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे अक्साई चीनचा भारताचा भाग म्हणून करण्यात आलेला समावेश. भारताच्या आक्षेपांनंतरही चीन या प्रदेशावर सातत्याने दावा करत आला आहे. जम्मू-काश्मीर आणि अरुणाचल प्रदेशासह भारताच्या सीमांचे चुकीचे चित्रण केल्याबद्दल परदेशी सरकारे आणि जागतिक संस्थांकडे भारताने वारंवार चिंता व्यक्त केली आहे.

### रणनीती की चूक?

अमेरिकेचे पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांशी बिघडत चाललेले संबंध पाहता हे पाऊल भारतासाठी जाणूनबुजून केलेले राजनैतिक संकेत होते असे अनेक तज्ज्ञांचे मत होते. तर काही तज्ज्ञ आणि विश्लेषकांनी अमेरिकेच्या या भूमिकेचे स्वागत केले होते. मात्र, चार दिवसांनंतर आज अमेरिकेच्या युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह (यूएसटीआर) कार्यालयाने भारताचा नकाशा दर्शविणारी एक्स पोस्ट त्यांच्या अधिकृत खात्यावरून काढून टाकली आहे.



## मामुटीच्या चित्रपटात नयनतारा

पॅट्रियट या आगामी चित्रपटातील अभिनेत्री नयनाताराचे फर्स्ट लुक पोस्टर सादर करण्यात आले आहे. या पोस्टरमध्ये नयनताराचा निम्मा चेहराच दिसून येत असून तिच्या चेहऱ्यावरील गंभीर भाव स्पष्टपणे पाहता येतात. पोस्टरमध्ये 'विरोध करणे देशभक्ती आहे' असे लिहिले असून हे चित्रपट सद्यकालीन सामाजिक-राजकीय मुद्द्यांशी निगडित असल्याचे संकेत देणारे आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन महेश नारायणन यांनी केले असून ते मल्याळी चित्रपटसृष्टीतील स्वत:च्या योगदानासाठी ओळखले जातात. या चित्रपटात मोहनलाल, मामूटी, फहाद फासिल, कुंचाको बोबन, दर्शना राजेंद्रन आणि रेवती यासारखे अनेक कलाकार सामील आहेत. या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला असून यात मोहनलाल हे कर्नल रहीम नाइकच्या भूमिकेत दिसून येतात, तर मामूटी हे डॉ. डॅनियल जेम्सची भुमिका साकारत आहेत. कहाणी याच दोन्ही भूमिकांच्या अवतीभवती गुंफण्यात आली असून ते एका बेकायदेशीर कारवाईला संपविण्यासाठी हात मिळवितात. टीझरमध्ये 'पेरिस्कोप' नावाचा एक रहस्मय एलिमेंटही दाखविण्यात आला असून एका स्टुडंट लॅपटॉम स्कीमचा उल्लेख आहे. महेश नारायणन यांनीच या चित्रपटाची कहाणी लिहिली आहे. चित्रपटात सुशिन श्याम यांनी संगीत दिले आहे. तर निर्मिती पॅन-इंडिया अप्रोचकडून करण्यात आली असून याचे चित्रिकरण भारतासह श्रीलंका आणि युएईत पार पडले आहे. हा चित्रपट चालूवर्षीच प्रदर्शित केला जाणार आहे.



## न्यूड फोटोशूट अन् करिअर ठरलं फ्लॉप

मॉडेल आणि अभिनेत्री शर्लिन चोप्रा ही अत्यंत वादग्रस्त व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखली जाते. तिने आपल्या करिअरमध्ये ज्या भूमिका केल्या, त्यामुळे ती बेरचदा चर्चेत राहिली. शर्लिन चोप्राने प्रस्थापित चौकट मोडून स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण अभिनेत्री म्हणून तिचं करिअर फार मोठं नाही. ती बोल्डनेस, रिॲलिटी शो आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून चर्चेत राहण्याचा प्रयत्न करते. शर्लिनने तिच्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली. २००२ मध्ये 'वेंधम' या तमिळ चित्रपटातून तिने अभिनयाला सुरुवात केली. बॉलीवूडमध्ये तिने 'टाइम पास' (२००५) या चित्रपटातून पदार्पण केलं. त्यानंतर तिने 'दोस्ती: फ्रेंड्स फॉरएव्हर', 'रकीब', 'रेड स्वस्तिक' आणि 'दिल बोले हडिप्पा!' यांसारख्या चित्रपटांमध्ये छोट्या आणि सहाय्यक भूमिका केल्या.


## अभिनेत्री होण्याचं स्वप्न म्हणजे अभ्यासापासून पळवाट



लैला मजनू', 'बुलबुल' आणि 'कला' या चित्रपटांमधील दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणारी अभिनेत्री तृप्ती डिमरी सध्या तिच्या आगामी चित्रपट 'ओ रोमियो' मुळे चर्चेत आहे. विशाल भारद्वाज दिग्दर्शित हा चित्रपट 13 फेब्रुवारी 2026 रोजी प्रदर्शित होत असून, त्यानिमित्ताने दिलेल्या एका खास मुलाखतीत तिच्या आयुष्यातील अनेक गोष्टी मनमोकळेपणाने सांगितल्या. तृप्तीने सांगितलं की, तिने 'लैला मजनू'सारख्या तीव्र प्रेमकथेने अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली असली, तरी प्रत्यक्ष आयुष्यात ती वेड्या प्रेमावर विश्वास ठेवत नाही. "प्रत्येकाची प्रेमाबद्दलची दृष्टी वेगळी असते. मला मात्र फक्त खऱ्या प्रेमावर विश्वास आहे. अतीव प्रेम मला फारसं कळत नाही," असं ती म्हणाली. तिचा चित्रपट व्हॅलेंटाईन डेच्या आसपास प्रदर्शित होत असला, तरी त्या दिवसाचं तिला विशेष आकर्षण नसल्याचंही तिने स्पष्ट केलं. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात तृप्तीने तीन वर्षांत तीन चित्रपट केले. मात्र 'एनिमल'च्या यशानंतर तिच्या वाट्याला एकामागोमाग एक चित्रपट येत आहेत. 2024 मध्ये ती 'बॅड न्यूज', 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' आणि 'भूल भुलैया 3' मध्ये झळकली. पुढे 'ओ रोमियो'सोबतच 'स्पिरिट' आणि 'मां बहन'सारख्या मोठ्या चित्रपटांमध्येही ती दिसणार आहे. याबद्दल बोलताना ती म्हणाली, "आता दर चौथ्या-पाचव्या चित्रपटासाठी माझ्याकडे ऑफर येते, हेच माझ्यासाठी मोठं समाधान आहे. कारण मी बराच मोठा प्रतीक्षेचा काळ पाहिला आहे.

## लाला हमसे ना भिडियो!

९० च्या दशकात आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे अभिनेते म्हणजे अनिल कपूर. त्यांच्या आजवरच्या चित्रपटसृष्टीवर नजर टाकल्यास त्यांचा ओरा काय लेव्हलचा आहे लक्षात येते. हा ओरा कायम टिकून ठेवण्याचे काम सगळ्याच कलाकारांना जमत नाही. पण अनिल कपूर याला अपवाद आहेत. आत्ताच्या घडीच्या चित्रपटातील त्यांचा अभिनय तरुणच वाटतो. नायक चित्रपटातील त्यांचा ॲक्शन अवतार प्रेक्षकांवर छाप पाडून गेला. आता पुन्हा एकदा अनिल कपूर यांनी त्यांच्या ॲक्शन अवतारात कमबॅक केले आहे. त्यांचा आगामी सुभेदार चित्रपटाचा दमदार टीझर प्रदर्शित झाला आहे. या टीझरमध्ये अनिल कपूर पुन्हा एकदा त्यांच्या ॲक्शन अवतारात परतले आहेत. निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर केली आहे. सुभेदार चित्रपटाचा टीझर अनिल कपूर आणि फैसल मलिक यांच्या एका दृश्याने सुरू होतो. टीझरमध्ये अनिल कपूर यांना राग येतो, परंतु त्यावर नियंत्रण मिळवण्याचे काम त्यांनी केले आहे. मात्र, त्यांचा राग शेवटी अनावर होतो आणि ॲक्शन मोडमध्ये जातो.



# टी-२० विश्वचषकात स्टीव्ह स्मिथची एन्ट्री

## कांगारूंचा नियमित कर्णधार मिचेल मार्श दुखापतीमुळे बाहेर

महाईन्यूज । मुंबई

**टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये ऑस्ट्रेलियन संघाला मोठा धक्का बसला आहे. स्पर्धेतील आपल्या पहिल्याच सामन्यात आयर्लंडविरुद्ध मैदानात उतरण्यापूर्वी कांगारूंचा नियमित कर्णधार मिचेल मार्श दुखापतीमुळे बाहेर फेकला गेला आहे. मार्शच्या अनुपस्थितीत संघाने अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथचा राखीव खेळाडू म्हणून संघात समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**

### मार्शला गंभीर दुखापत

विश्वचषकाच्या 'ग्रुप-बी' मधील आयर्लंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी मिचेल मार्शला 'ग्रोइन इंजरी' झाल्याचे समोर आले. त्यामुळे तो या महत्त्वाच्या सामन्याला मुकणार असून, त्याच्या जागी सलामीवीर ट्रॅव्हिस हेडकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने दिलेल्या माहितीनुसार, सरावादरम्यान मार्शला ही दुखापत झाली. स्कॅन अहवालात त्याच्या दुखापतीचे स्वरूप गंभीर असल्याचे स्पष्ट झाले असून, डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच त्याच्या पुनरागमनाबाबत निर्णय घेतला जाईल.



### ऑस्ट्रेलियन संघाला दुखापतींचे ग्रहण

स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच ऑस्ट्रेलियन संघ दुखापतग्रस्त खेळाडूंच्या समस्येने ग्रासलेला दिसत आहे. आयर्लंडविरुद्धच्या सामन्यासाठी संघाकडे निवडीसाठी केवळ १२ तंदुरुस्त खेळाडू उपलब्ध होते. स्टार वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स आधीच बाहेर असताना, जोश हेझलवूडच्या जागी अद्याप कोणताही बदली खेळाडू संघात सामील झालेला नाही. अशा परिस्थितीत स्मिथचा अनुभव कांगारूंसाठी मोलाचा ठरणार आहे.

### स्मिथ पुन्हा टी-२० मैदानात

मिचेल मार्शच्या दुखापतीची व्याप्ती पाहता, अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथला पाचारण करण्यात आले आहे. स्मिथने आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना २०२४ च्या अखेरीस खेळला होता. मात्र, नुकत्याच पार पडलेल्या 'बिग बॅश लीग २०२५-२६' मध्ये सिडनी सिक्सर्सकडून खेळताना त्याने उत्कृष्ट कामगिरी केली होती. आता श्रीलंकेतील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी तो लवकरच संघात दाखल होणार आहे.

# भारतीय कोचने IND vs PAK सामन्यावर केले मोठे विधान

महाईन्यूज । मुंबई

**भारत टी-20 विश्वचषकातील दुसरा सामना नामीबियाविरुद्ध खेळेल. हा सामना उद्या म्हणजे 12 फेब्रुवारी रोजी दिल्लीमध्ये खेळवला जाणार आहे. पहिला सामना भारताने अमेरिकेविरुद्ध खेळला जो भारताने जिंकला. आता दिल्ली येथील सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेच भारतीय कोचने INDIA VS PAKISTAN सामन्यावर एक मोठे विधान केले ज्याची आता चर्चा होत आहे.**




### भारत पाकिस्तान पेक्षा ठरतोय वरचढ

आयसीसी स्पर्धांमधील गेल्या चार सामन्यांबद्दल बोलायचे झाले तर, टीम इंडियाने सर्व सामन्यांमध्ये पाकिस्तानला पराभूत केले आहे. गेल्या वेळी भारताने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी 2025 मध्ये पाकिस्तानला 6 विकेट्सने हरवले होते. 2024 च्या टी-20 विश्वचषकात भारताने पाकिस्तानला 6 धावांनी हरवले होते. 2023 च्या एकदिवसीय विश्वचषकात भारताने पाकिस्तानला 7 विकेट्सने हरवले होते. 2022 च्या टी-20 विश्वचषकात भारताने पाकिस्तानला 4 विकेट्सने हरवले होते.

भारताचा पाकिस्तान विरुद्धचा सामना 15 फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणार आहे. विशेष म्हणजे, टीम इंडियाचे सहाय्यक प्रशिक्षक टेन डेस्केटे यांनी या सामन्यापूर्वी एक महत्त्वपूर्ण विधान केले. टेन डेस्केटेने सांगितले की 15 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सामन्यात पाकिस्तानला फायदा होईल. टीम इंडियाची ताकद कितीही असली तरी पाकिस्तानला फायदा होईल. भारतीय प्रशिक्षकाने असे का म्हटले ते पाहा.

टेन डेस्केटे यांनी पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यापूर्वी सांगितले की, "शेजारील संघाला जास्त फायदा होऊ शकतो. डेस्केटे यांनी त्याचे कारणही स्पष्ट केले. ते म्हणाले, "कोलंबोमध्ये सामना खेळणे आव्हानात्मक असू शकते कारण पाकिस्तान गेल्या दोन आठवड्यांपासून तिथेच आहे. आमचे ध्येय त्या सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करणे असेल. बरोबर आहे की पाकिस्तानला फायदा होऊ शकतो, परंतु हे देखील खरे आहे की आयसीसी स्पर्धांमध्ये भारत पाकिस्तानविरुद्ध तटस्थ ठिकाणी खेळतो, जिथे टीम इंडिया चांगली कामगिरी करते."

सहाय्यक प्रशिक्षक टेन डोस्केटे म्हणाले, "अभिषेक शर्माची तब्येत ठीक नाही आणि तो सरावाला उपस्थित राहिला नाही. नामिबियाविरुद्धच्या सामन्यात त्याच्या जागी संजू सॅमसन खेळू शकतो." अभिषेक शर्मा अमेरिकेविरुद्ध पहिल्याच चेंडूवर बाद झाला आणि त्या सामन्यात संजूला बेंचवर ठेवण्यात आले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। गुरुवार ।

दि. 12 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### पहिल्या टप्प्यात 100 महिला पायलटची नेमणूक; मार्च 2026 मध्ये मेट्रो सुरू होण्याचे लक्ष्य

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो महिलांच्या हाती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे शहरातील तिसरा मेट्रो मार्ग म्हणजेच माण, हिंजवडी ते शिवाजीनगर (पिंक लाईन) ही मेट्रो सेवा प्रत्यक्षात मार्गावर धावण्यासाठी संबंधित कंपनीचे प्रयत्न सुरु आहेत. या मेट्रोचे स्टेअरिंग महिलांच्या हातात देण्यात येणार आहे. अभियंता असलेल्या तरुणींना मेट्रोचे सारथ्य करण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण देखील पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यात शंभर महिला ट्रेन पायलटची नेमणूक केली असून, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडने या प्रकल्पाच्या संचलन आणि देखभाल करणार आहे.**





## फ्रेंच कंपनीकडून प्रशिक्षण

पुणे व परिसरातील बी.टेक इंजिनिअर अथवा संबंधित क्षेत्रातील व्यक्तींना मुलाखतीद्वारे निवडले जाते. फ्रेंच येथील किओलिस या कंपनीकडून त्याचे नियंत्रण राहणार आहे. या उमेदवारांकडून चार महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करुन घेतले जाते. त्यातून उमेदवार निवडले जातात. सध्या या सर्व महिला पायलटना थेट ट्रेन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. माण डेपो येथे त्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. त्यानंतर त्यांची शारीरिक तंदुरुस्ती चाचणी घेतली जाते. पायलट म्हणून निवड झालेल्या तरूणींच्या चेहऱ्यावर या 'हटके' काम शिकत असल्याचा आनंद दिसून आहे.

सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून आकाराला येत असलेल्या या प्रकल्पात टाटा आणि सीमेन्स यांसारख्या कंपन्यांचा सहभाग आहे. मात्र, केवळ महिलांच्या हाती संचलनाची धुरा सोपवण्याचा हा निर्णय जागतिक रेल्वे क्षेत्रात 'अद्वितीय उपक्रम' म्हणून ओळखला जाणार आहे. या ट्रेन पायलट महिलांच्या निवडीसोबतच त्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष 'प्रोटोकॉल' तयार करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणापासून ते प्रवासापर्यंतच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही कंपनी घेणार आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीचे साधन नसून तो महिला सक्षमीकरणाचे जागतिक प्रतीक ठरेल, असा विश्वास 'पीएमआरडीए'ने व्यक्त केला.

## 40 मिनिटांत अंतर पार

हिंजवडीतील आयटी हबमधून शिवाजीनगरला पोहोचण्यासाठी रस्ते मार्गाने दीड तासांचा वेळ लागतो. मेट्रोमुळे हे अंतर अवघ्या 40 मिनिटांत पार करणे शक्य होईल. यामुळे लाखो आयटी कर्मचार्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक समावेशकता यांचा मेळ घालत 'पीएमआरडीए'ने पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक आणखी बळकट केली आहे.

दरम्यान, हा मार्ग मार्च 2026 मध्ये सुरु करण्यासाठी संबंधित कंपनीकडून प्रयत्न सुरु आहेत. तांत्रिक आणि सिग्नलचे काम झाले आहे. त्यानुसार या कामाचे प्रशिक्षण संबंधित महिलांना देण्यात येत आहे. तसेच, या कामाची माहिती व कामाचे स्वरुप समजून सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता मेट्रोची सुरुवात झाल्यानंतर त्याबाबतचे सर्व नियंत्रण हे या महिलांचे असणार आहे.

# मोशी-चिखली परिसरातील अतिक्रमण हटवण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी प्राधिकरणातील सेक्टर ११ व १३ मधील उड्डाणपुलाखाली तसेच सीएनजी पंपालगत असलेल्या COEP कॉलेज रोडवरील मोठ्या प्रमाणातील अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी मागणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. आठ दिवसांत कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.**

> “ मोशी-चिखली-पिंपरी परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि दैनंदिन अडचणींचा प्रश्न आम्ही अतिशय गांभीर्याने घेतला आहे. महानगरपालिकेने केवळ दिखाऊ कारवाई न करता सर्व अतिक्रमणे कायमस्वरूपी हटवावीत, ही आमची ठाम भूमिका आहे. नागरिकांना दिलासा मिळेपर्यंत फेडरेशनचा लढा सुरूच राहील.
>
> – संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.



मोशी प्राधिकरणातील सेक्टर ११ व १३ मधील उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात हातगाड्या, टपऱ्या तसेच छोटे-मोठे हॉटेल्सचे अतिक्रमण झाले असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडी, अस्वच्छता आणि असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच सीएनजी पंपालगत असलेल्या नियोजित शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या रस्त्यावर संध्याकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणात हातगाड्या व भाजीविक्रेते बसत असल्याने नागरिकांना ये-जा करणे कठीण होत आहे. प्रभाग क्रमांक ८ आणि २ मधील रस्त्यांवरील सर्व अतिक्रमणे त्वरित हटवावीत, अशीही ठाम मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात क्रांती चौकातील अतिक्रमण हटवण्यासाठी 'क' क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग अधिकारी तथा अतिक्रमण विभाग प्रमुख श्री. अजिंक्य येळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे, फेडरेशनचे उपाध्यक्ष संदीप कुंभार, मैदर्गी साहेब, संदीप तांदळे, टिळेकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते. आजच्या बैठकीत लवकरच आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून आयुक्तांसोबत बैठक घेऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

# आवाज कुणाचा? माटे शाळेचा! 'सकाळ NIE' आंतरशालेय नाट्य स्पर्धेत 'निर्धार'ची बाजी

## निगडी-प्राधिकरणात दिमाखदार पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**"अरे आवाज कुणाचा...?" निकालाची प्रचंड उत्कंठा, विजयाचा जल्लोष आणि टाळ्यांचा कडकडाट... अशा अत्यंत उत्साही वातावरणात 'सकाळ एनआयई' (NIE) आयोजित आंतरशालेय नाट्य स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा निगडी-प्राधिकरण येथे पार पडला. या स्पर्धेत पिंपरी-चिंचवड विभागातून चिंचवड येथील व्ही. के. माटे हायस्कूलच्या 'निर्धार' या नाटिकेने प्रथम क्रमांक पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले.**



विद्यार्थ्यांच्या अंगभूत अभिनय कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'सकाळ माध्यम समूहा'च्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील अनेक शाळांनी यात सहभाग नोंदवून सामाजिक प्रश्न आणि जनजागृतीवर आधारित प्रभावी नाटिका सादर केल्या.

### दिग्गजांच्या हस्ते सन्मान

मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे कार्यवाह मनोज देवळेकर, उपकार्यवाह सुधीर कुलकर्णी, कोषाध्यक्ष शिवराज पिंपुडे आणि 'सकाळ'चे सहयोगी संपादक जयंत जाधव यांच्या हस्ते विजेत्या संघांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची मोठी उपस्थिती होती. 'सकाळ एनआयई'चे वरिष्ठ व्यवस्थापक विशाल सराफ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### स्पर्धेचा सविस्तर निकाल

- सांघिक निकाल (पिंपरी-चिंचवड विभाग): प्रथम क्रमांक: व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड (नाटिका: निर्धार). द्वितीय क्रमांक: ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी (नाटिका: पहाट). तृतीय क्रमांक: अमृता विद्यालयम्, निगडी (नाटिका: शह). उत्तेजनार्थ: एच. ए. विद्यालय, पिंपरी (फिनिक्स) व फत्तेचंद जैन विद्यालय, चिंचवड (भावनांची पेटी)
- वैयक्तिक व तांत्रिक यश: उत्कृष्ट अभिनय: दुर्वांकुर इंगळे (एच. ए. विद्यालय), काव्या साताळकर (व्ही. के. माटे हायस्कूल). उत्कृष्ट दिग्दर्शन: भार्गवी शिंदे, संकेत भोसले (व्ही. के. माटे हायस्कूल). उत्कृष्ट नेपथ्य: व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड

> आमच्या विद्यार्थ्यांनी 'निर्धार' नाटिकेच्या माध्यमातून सामाजिक विषयाची जी मांडणी केली, त्याला मिळालेली ही पावती आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मुलांची मेहनत यामुळेच आम्ही प्रथम क्रमांकासह दिग्दर्शन आणि नेपथ्यातही यश मिळवू शकलो. 'सकाळ एनआयई'ने उपलब्ध करून दिलेल्या या व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास नक्कीच वाढला आहे. – इंद्रायणी पिसोळकर
> प्राचार्या, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड

# पंडित दीनदयाळ उपाध्याय पुण्यतिथीनिमित्त 'समर्पण दिन' उत्साहात

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पक्षाचे प्रेरणास्थान पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची पुण्यतिथी आणि 'समर्पण दिन' भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर भाजप कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



या प्रसंगी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांनी आपल्या भाषणात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनातील विविध प्रसंग आणि त्यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकला.

भाजपचे शहर उपाध्यक्ष तसेच ज्येष्ठ नेते रवींद्र देशपांडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा खडतर जीवनप्रवास, भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेतील त्यांचे योगदान आणि समाजातील शेवटच्या घटकांसाठी त्यांची असलेली आस्था याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला भाजपचे सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशालीताई खाडे, नगरसेविका सुप्रियाताई चांदगुडे, नगरसेविका अनुराधाताई गोरखे, सीए आघाडी अध्यक्ष बबनराव डांगले, व्यापारी आघाडीचे सतपाल गोयल, माजी नगरसेवक जगदीश शेट्टी, गणेश वाळुंजकर, सुधीर निर्बीकर, प्रसाद दिवाळीलीकर, प्रकाश सोळंकी, किशोर पवार, अशोक शुभेदार, प्रकाश बंब, रमेश पुजारी, रविंद्र सानप, सुभाष सिंगल, गोविंद सिंदे, अभिजित रॉय, शरद पेद्दी आणि संजय परळीकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर महामंत्री मधुकर बच्चे यांनी केले.

> "पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवन आपल्याला शिकवते की समर्पण आणि सेवा याशिवाय समाजात खरी प्रगती साधता येत नाही. आपण सर्व कार्यकर्त्यांनी त्यांच्या आदर्शांचा आचरणात अवलंब केला पाहिजे." – शत्रुघ्न काटे,
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# Pune and Pimpri Chinchwad witnessed vibrant energy and youthful enthusiasm as students

MAHAENEWS I PUNE

**from Dr. Sushant Patil Group's Dr. D.Y. Patil Varale Campus successfully organized and performed a series of flash mobs across prominent public locations. The initiative aimed to spread positivity, creativity, and cultural expression while engaging the general public through high-energy dance performances.**




The flash mobs were performed at Dasara Chowk, Baner; Balewadi Highstreets; Grand Highstreets Mall, Hinjewadi; Sant Dnyaneshwar Chowk, Nigdi; Mandai Metro Station near Dagdusheth; and Bhakti Shakti Chowk, Nigdi. Each location witnessed an enthusiastic response from onlookers, who gathered in large numbers to enjoy the spontaneous and energetic performances by the students.



The students showcased remarkable coordination, confidence, and passion, leaving the audience impressed with their vibrant performances. The event reflected the strong cultural spirit and teamwork fostered by the institution.

This successful event was organized with the constant guidance and encouragement of Dr. Sushant Patil sir and Adv. Anuja Patil ma'am. The management and academic leadership also extended their valuable support, including Directors and Principals Dr. Suresh Mali, Dr. Meghana Bhilare, Dr. Suresh Shirbhadurkar, and Dr. R.T. Golgire.

The organizing team played a crucial role in planning and executing the event smoothly. The team included Creative and Cultural Director Shreyas Deshpande, along with Unmesh Korde, Mangesh Dhole, Tanmay Mattalwar, Hemant Pansare, Jayesh, Jay, and Raju Pasalkar. Their dedication and creativity ensured the grand success of the flash mob series.

The event stood as a fine example of how cultural activities can bring joy to the community while providing students a platform to express their talent beyond academics.

# Mumbai–Pune Expressway: Borghat to Have Emergency Unit

MAHAENEWS I PUNE

**In a major development aimed at improving emergency response on the Mumbai–Pune Expressway, a permanent emergency assistance centre will soon be established at Borghat. The decision was taken during a joint meeting between the Maharashtra State Road Development Corporation (MSRDC) and the Highway Safety Police (HSP). The process of identifying suitable land for the facility has already begun.**



The move comes in the wake of a serious incident on February 3, when a tanker carrying the chemical gas propylene overturned on the expressway, forcing authorities to shut down traffic for more than 32 hours. Due to heavy congestion, emergency services faced delays in reaching the accident site. The incident exposed gaps in administrative coordination and emergency preparedness.

Following the disruption, Chief Minister Devendra Fadnavis directed MSRDC and concerned administrative agencies to take immediate corrective measures. As a result, officials decided to set up a permanent emergency response centre at Borghat.

The Borghat stretch, located between Khandala and Khopoli, spans approximately 18 to 20 kilometres and is considered highly accident-prone due to steep gradients, tunnels, and sharp curves. Reaching accident sites in this section often takes considerable time during emergencies.

The proposed centre will be equipped with heavy-duty cranes for vehicle recovery, fire-fighting systems, ambulances, patrol vehicles, water tankers, lighting systems, gas-handling equipment, a response unit, and trained manpower. Borghat has been selected due to its central geographical location on the expressway between Mumbai and Pune.

Officials stated that the centre will not be temporary but a permanent facility aimed at ensuring swift handling of emergencies, reducing prolonged traffic disruptions, and restoring normal movement as quickly as possible. A final decision regarding the land allocation will be taken soon, and further action will follow in the next review meeting, MSRDC officials said on condition of anonymity.

Superintendent of Police (Highway Traffic) Tanaji Chikhale said, "Accidents occur frequently in the Borghat area. This centre will prove extremely useful in providing immediate assistance during emergencies."

He further added, "The Borghat emergency centre will enable faster response times and help prevent large-scale traffic congestion."

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS' HIRING

**WALK-IN INTERVIEW**

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.

## Walk-In Schedule Timings:

**Saturday, 14th February 2026**
**Timing: 11:00 AM to 4:00 PM**

**Monday to Friday**
**Timing: 2:00 PM to 4:30 PM**

## Venue:

RKL Galaxy International School, Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005

